| वर्ष - 8 | अंक -88 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा रंग राखाडी

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 05 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार यांची घेतली भेट

# एकनाथ शिंदेंना जबर धक्का!


### जावयाचा शिवसेनेला पाठिंबा, सासरे 'तुतारी' वाजवण्याच्या तयारीत

। पुणे । महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देणाऱ्या निहार ठाकरे यांच्या सासऱ्यांनी भाजपला धक्का दिला आहे. निहार यांचे सासरे अर्थात भाजप नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. निहार ठाकरे हे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नातू, तर हर्षवर्धन यांच्या कन्या अंकिता पाटील यांचे पती आहेत. हर्षवर्धन पाटील यांना इंदापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची इच्छा असून, तिथे राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्ता भरणे आमदार असल्याने हर्षवर्धन पाटील यांना महायुतीतून उमेदवारीची शक्यता जवळपास नाही.**



#### हर्षवर्धन पाटील यांच्यासाठी 'राष्ट्रवादी'ची दारे उघडतील?



भाजपच्या अनेक बैठकांना त्यांनी दांडी मारली, कार्यकर्त्यांनी भाजपला रामराम ठोकण्याची विनंती करून 'तुतारी' हातात घेण्याची मागणी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे हर्षवर्धन पाटील आता 'राष्ट्रवादी' मध्ये जाणार आणि 'तुतारी' वाजविणार अशा चर्चेला उधाण आले होते. मात्र, त्याबाबत शरद पवार किंवा अन्य कोणीही पदाधिकाऱ्यांनी जाहीररीत्या कोणतेही वक्तव्य केले नसल्याने पाटील यांच्यासाठी शरद पवार 'राष्ट्रवादी'ची दारे उघडतील का, अशी उलटसुलट चर्चा सुरू झाली होती.

#### कोण आहेत निहार ठाकरे?

निहार ठाकरे हे दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र बिंदूमाधव ठाकरे यांचे चिरंजीव आहेत. बिंदुमाधव यांचा १९९६ मध्ये अपघाती मृत्यू झाला. निहार ठाकरे राजकारणापासून दूर होते. मात्र एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केल्यानंतर निहार ठाकरेंनी त्यांची भेट घेत पाठिंबा दर्शवला होता.

निहार ठाकरे हे व्यवसायाने वकील आहेत. मुंबई उच्च न्यायालयात ते प्रॅक्टिस करतात. राजकीय कायदेशीर सल्लागार, कॉर्पोरेट व्यवहाराच्या कागदपत्रांची ड्राफ्टिंग, देशांतर्गत आणि बहुराष्ट्रीय कॉर्पोरेट ग्राहकांमध्ये तडजोडी करणे यासारखी कामे ते करतात.

#### सिल्व्हर ओकवर भेटीगाठी

हर्षवर्धन पाटील यांनी गुरुवारी शरद पवार यांची सिल्व्हर ओक येथील निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत कन्या अंकिता पाटीलही होत्या. हर्षवर्धन पाटील यांचे सुपुत्र राजवर्धन यांनी आपल्या समाजमाध्यमावर राष्ट्रवादी-शप पक्षाचे चिन्ह 'तुतारी'चा फोटो ठेवल्याने पक्षप्रवेश लवकरच होईल, अशी अटकळ आहे.

'जनसन्मान' यात्रेदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूरमध्ये आमदार दत्ता भरणे हेच उमेदवार असतील, असे थेट जाहीर केले. त्या दिवसापासून महायुतीच्या मित्रपक्षांमध्ये विशेषतः इंदापूरमध्ये ठिणगी पडली.

तेव्हापासून हर्षवर्धन पाटील आणि त्यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली. त्यानंतर पाटील नाराज असल्याचे दिसून आले.

---

## सावरकरांच्या बदनामी प्रकरणी पुणे न्यायालयाकडून राहुल गांधींना समन्स

### 23 ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

लोकसभा विरोधीपक्ष नेते तसेच कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांना पुणे उच्च न्यायालयाने समन्स बजावले आहेत. तसेच त्यांना 23 ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे. सावरकर यांच्यावर राहुल गांधी यांनी आक्षेपार्ह टिप्पणी केली होती.

या प्रकरणी राहुल गांधी यांच्या विरोधात पुणे न्यायालयात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला असून न्यायालयाने याप्रकरणी कॉंग्रेस नेत्याला समन्स बजावले आहेत.

#### नाशिक कोर्टानेही समन्स बजावले

यापूर्वी नाशिक न्यायालयानेही त्यांना याच प्रकरणात समन्स बजावले आहे. नाशिकच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी दीपाली परिमल कडूसकर यांनी राहुल गांधी यांना 27 ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे समन्स (नोटीस) बजावले आहेत.

न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, महापुरूष वीर सावरकर यांच्याविरोधात राहुल गांधी यांनी केलेले विधान प्रथमदर्शनी मानहानीकारक असल्याचे दिसते. या खटल्याच्या पुढील तारखेला राहुल गांधी यांना वैयक्तिकरित्या किंवा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत न्यायालयात हजर राहावे लागेल, असे न्यायालयाने म्हटले आहे.

दरम्यान, सावरकरांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी मागील वर्षी एप्रिल महिन्यात पुणे न्यायालयात राहुल गांधींच्या विरोधात याचिका दाखल केली होती.या याचिकेत राहुल गांधी यांच्यावर सावरकर यांची बदनामी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. 5 मार्च 2023 रोजी लंडनमध्ये दिलेल्या भाषणात राहुल गांधी यांनी सावरकर यांची बदनामी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षाने चालवलेल्या 'संविधान बचाव' अभियानाचा विधानसभेत फटका बसू



#### मंत्री किरेन रिजिजू यांचा हल्लाबोल

पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शिव्या द्यायचे, पूर्णवेळ स्वत:च बोलायचे आणि वरून बोलू दिले जात नाही, असा कांगावा करणारे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी माओवादी आहेत', असा घणाघाती आरोप केंद्रीय संसदीय कामकाज व अल्पसंख्याक किरेन रिजिजू यांनी केला.

# गृहमंत्री सत्तेच्या मोहात आंधळे!

## अत्याचाराच्या घटनांवरून रोहित पवारांचे फडणवीसांवर टीकास्त्र!

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच वानवडी भागातील एका नामांकित शाळेतील ६ वर्षांच्या दोन मुलींवर चालत्या व्हॅनमध्ये चालकाने लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच आता कोंढव्यातील बोपदेव घाटात मित्रांबरोबर फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याचं पुढे आलं आहे.**



या घटनानंतर आता सर्वत्र संताप व्यक्त केला जातो आहे. यावरून राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार ) आमदार रोहित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनांवरून राज्य सरकारला लक्ष्य केलं आहे.रोहित पवार यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. "बोपदेव घाटात घडलेली सामुहिक अत्याचाराची घटना महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. शाळा, कॉलेजे, रस्ते, हॉस्पिटल्स काहीही आज सुरक्षित राहिलेले नाहीत, परिणामी महाराष्ट्रात कधी नव्हती एवढी असुरक्षेची भावना आज पसरली आहे", असं रोहित पवार म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी या घटनांवरून राज्य सरकारलाही लक्ष्य केलं. "राज्यात कायदा-सुव्यवस्था व्हेंटिलेटरवर पोहचली आहे. पण राज्याचे गृहमंत्री मात्र धृतराष्ट्राप्रमाणे सत्तेच्या मोहात आंधळे होऊन महिला सुरक्षेच्या विषयाकडे दुर्लक्ष करत आहेत. एकीकडे महिला सन्मानाच्या गोल गोल गप्पा करायच्या आणि दुसरीकडे मात्र शक्ती कायदा लागू करण्यासंदर्भात काहीच करायचं नाही, ही दुटप्पी भूमिका योग्य नाही", अशी टीकाही रोहित पवार यांनी केली.राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( शरद पवार ) खासदार सुप्रिया सुळे यांनीही या प्रकरणावरून संताप व्यक्त करत राज्य सरकारवर टीका केली आहे. "बोपदेव घाटात एका मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याची घटना उजेडात आली आहे. पुणे आणि राज्यभरात सातत्याने महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढतच आहेत. या घटनांना पायबंद घालण्यासाठी गृहखाते काहीही करताना दिसत नाही. दुर्दैवाने महाराष्ट्र महिलांसाठी सुरक्षित राहिलेला नाही, असं म्हणावं लागत आहे, असे त्या म्हणाल्या. तसेच शासनाने या घटनेतील आरोपींना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी", अशी मागणीही सुप्रिया सुळे यांनी केली.कोंढव्यातील बोपदेव घाटात मित्रांबरोबर फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पीडित तरुणी मूळची परराज्यातील आहे. तिचा मित्र जळगावमधील आहे. दोघे एका महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. गुरुवारी (३ ऑक्टोबर) रात्री तरुणी आणि तिचा मित्र बोपदेव घाट परिसरात फिरायला गेले होते. रात्री अकराच्या सुमारास तरुणी अणि तिचा मित्र घाटात गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी त्यांना धमकावले. तरुणीला धमकावून तिघांनी तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिघे जण पसार झाले..रोहित पवार यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. हॉस्पिटल्स काहीही आज सुरक्षित राहिलेले नाहीत, परिणामी महाराष्ट्रात कधी नव्हती एवढी असुरक्षेची भावना आज पसरली आहे", असं रोहित पवार म्हणाले.

### महिला सुरक्षेच्या विषयाकडे दुर्लक्ष

"राज्यात कायदा-सुव्यवस्था व्हेंटिलेटरवर पोहचली आहे. पण राज्याचे गृहमंत्री मात्र धृतराष्ट्राप्रमाणे सत्तेच्या मोहात आंधळे होऊन महिला सुरक्षेच्या विषयाकडे दुर्लक्ष करत आहेत. एकीकडे महिला सन्मानाच्या गोल गोल गप्पा करायच्या आणि दुसरीकडे मात्र शक्ती कायदा लागू करण्यासंदर्भात काहीच करायचं नाही, ही दुटप्पी भूमिका योग्य नाही", अशी टीकाही रोहित पवार यांनी केली.. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( शरद पवार ) खासदार सुप्रिया सुळे यांनीही या प्रकरणावरून संताप व्यक्त करत राज्य सरकारवर टीका केली आहे. "बोपदेव घाटात एका मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याची घटना उजेडात आली आहे.

# जागा न मिळाल्यास महाविकास आघाडीत प्रवेश

## राष्ट्रवादीच्या माजी नगरसेवकांचा अजितदादांना इशारा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी निवडणुकीसाठी चिंचवड विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसला न मिळाल्यास महाविकास आघाडीत ज्या पक्षाला जागा मिळेल, त्या पक्षात प्रवेश करण्याचा ठराव राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिंचवडमधील माजी नगरसेवकांनी केला.**



याबाबत दोन दिवसात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन ठरावाची प्रत दिली जाणार आहे. त्यामुळे चिंचवडच्या जागेवरून महायुतीत तिढा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.ताथवडे येथे शुक्रवारी (४ माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, विनोद नढे, मोरेश्वर भोंडवे, मयूर कलाटे, अतुल शितोळे, प्रशांत शितोळे, संतोष कोकणे, कैलास बारणे, माजी नगरसेविका उषा काळे यावेळी उपस्थित होते. चिंचवडमध्ये भाजपचा विद्यमान आमदार असल्याने महायुतीच्या ठरलेल्या सूत्रानुसार ही जागा भाजपकडेच कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या राष्ट्रवादीतील माजी नगरसेवक, पदाधिका-यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी चिंचवडची जागा राष्ट्रवादीला न मिळाल्यास भाजपच्या प्रचारावर बहिष्कार घालण्याचा इशारा चार माजी नगरसेवकांनी दिला होता. यानंतरही पक्षाने कोणतीही दखल घेतली नाही. माजी नगरसेवकांनी ज्येष्ठ ने त्यानंतर शुक्रवारी या माजी नगरसेवकांनी ताथवडेत बैठक घेतली. निवडणूक लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असलेले नाना काटे यांच्यासह बहुतांश माजी नगरसेवक बैठकीला उपस्थित होते.लोकसभा निवडणुकीत महायुतीचा धर्म पाळून राष्ट्रवादीच्या पदाधिका-यांनी प्रामाणिकपणे काम केले. परंतू, मतदान झाल्यानंतर राष्ट्रवादीने काम केले नसल्याचा आरोप शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केला.

### भाजपचे काम करणार नाही

**निवडणूक लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असलेले नाना काटे यांच्यासह बहुतांश माजी नगरसेवक बैठकीला उपस्थित होते.** महापालिका निवडणुकांमध्येही भाजप उमेदवारांचे काम करायचे का, अशा संतप्त भावना उपस्थित माजी नगरसेवक, पदाधिका-यांनी व्यक्त केल्या. यानंतर चिंचवडची जागा राष्ट्रवादीला न मिळाल्यास महाविकास आघाडीत प्रवेश करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. आम्ही सर्व जण एकत्र असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे चिंचवडच्या जागेची मागणी करणार आहोत. राष्ट्रवादीचा एकही कार्यकर्ता भाजपचे काम करणार नाही. आमच्यापैकी ज्याला उमेदवारी मिळेल, त्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहोत, असे माजी नगरसेवक मयूर कलाटे यांनी सांगितले.

## 'पीएमपीएमएल'च्या कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर:

# सातव्या वेतन आयोगाचा फरकाचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा!

## पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची सकारात्मक भूमिका

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) कर्मचाऱ्यांचा सातव्या वेतन आयोगाचा फरक मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पीएमपीएमच्या कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाच्या फरकाचा पहिला हप्ता तातडीने देण्यासाठी अपवादात्मक बाब म्हणून 2024-25 च्या संचलन तुटीपोटी अग्रीम 56 कोटी 10 लाख रुपये देण्यास मान्यता दिली. यासाठी भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला होता.**




> पीएमपीएमल कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देण्याची मागणी होती. त्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न केले. अखेरीस पाठपुराव्याला यश आले आहे. फरकाचा पहिला हप्ता देण्यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी 56 कोटी रुपये दिले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना लवकरच फरक मिळेल.
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांचे विलीनीकरण करून पीएमपीची स्थापना करण्यात आली. पुणे महापालिकेचा 60 टक्के आणि पिंपरी महापालिका 40 टक्के संचलन तूट देते. पीएमपीएमएल संस्थेस संचलन तूट आणि पासेसपोटी संचलन तूट दिली जाते.

उपमुख्यमंत्री, लोकप्रतिनिधी, पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम चार हप्त्यात देण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या 1 एप्रिल 2017 ते 30 नोव्हेंबर 2022 या 68 महिन्याची सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम 561 कोटी रुपये होत आहे.

त्यानुसार पिंपरी महापालिकेच्या 40 टक्के हिस्स्यानुसार 224 कोटी 40 लाख रुपये होत आहेत. पीएमपीएमच्या कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाच्या फरकाचा पहिला हप्ता तातडीने देण्यासाठी अपवादात्मक बाब म्हणून 2024-25 च्या संचलन तुटीपोटी अग्रीम 56 कोटी 10 लाख रुपये पीएमपीएमला देण्यास आयुक्तांनी मान्यता दिली. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस

### आयुक्त शेखर सिंह यांनी केली घोषणा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज




> दरवर्षी महापालिकेच्या वर्धापनदिनी बोनस जाहीर करण्याची म्हणजे त्याचा आदेश काढण्याची पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेल्या वीस वर्षांपासूनची परंपरा आहे. ती यावेळी पाळली गेल्याने कर्मचारी सुखावला गेला. त्यांनी आनंद व्यक्त केला.
> **–बबनराव झिंजुर्डे,** अध्यक्ष, महापालिका कर्मचारी महासंघ

महापालिकेच्या आस्थापनेवरील साडेसहा हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिवाळीपूर्वीच मोठी खुशखबर दिली आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिवाळी बोनसची घोषणा केली. त्यानुसार किमान महिन्याच्या पगाराएवढा हा बोनस या महिन्याच्या पगाराअगोदर दिवाळीपूर्वीच त्यांना मिळणार आहे. महापालिका आयुक्तांसह वैद्यकीय विभागातील अधिकाऱ्यांना लाखांत बोनस मिळणार आहे.

राज्यातील मोजक्याच हातावर मोजता येतील इतक्याच महापालिका दरवर्षी बोनस देत आहेत. मुंबई ही सर्वात मोठी आणि केरळ राज्याएवढा अर्थसंकल्प असलेली महापालिका तो देत नाही. पुणे महापालिकेच्या अगोदर तो जाहीर करून पिंपरी-चिंचवड महापालिकेने यावर्षी आघाडी घेतली. यावर्षी सेवानिवृत्त झालेले, राजीनामा दिलेले, व्हीआरएस घेतलेले तसेच निलंबित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनाही बोनस मिळणार आहे. फक्त सहा महिन्यांपेक्षा कमी सेवा झालेले नवीन कर्मचारी आणि अधिकारी यापासून वंचित राहणार आहेत. तर मानधनावरील अधिकारी, कर्मचारी यांना वीस हजार रुपये दिले जाणार आहेत. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी साडेआठ टक्के सानुग्रह अनुदानाशिवाय वीस हजार रुपये जादा बोनस म्हणून मिळणार आहे. त्यानुसार चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना किमान चाळीस हजार, तर प्रथम श्रेणीतील अधिकाऱ्याला अडीच लाख रुपये बोनस मिळणार आहे. अनेक अधिकारी त्यातून लखपती होणार आहेत.

---

## मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल पिंपरीत भाजपकडून आनंदोत्सव

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज




### मराठी भाषाप्रेमींसाठी हा ऐतिहासिक सोनेरी दिन

> आपल्या माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला हा आजचा दिवस "लाभले आम्हास भाग्य; बोलतो मराठी" असं अभिमानाने म्हणणाऱ्या जगभरातील प्रत्येक मराठी भाषिकांसाठी ऐतिहासिक आणि सुवर्णाक्षरात लिहिला जावा असा दिवस आहे. हा निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या शिष्टमंडळाचे तसेच गेल्या अनेक वर्षांपासून यासाठी संघर्ष करणाऱ्या आणि सातत्याने पाठपुरावा, प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची काल (गुरुवारी) महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करण्यासाठी पिंपरी चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोरवाडी येथील भारतीय जनता पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयाजवळ एकत्रित येत मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी 'मी मराठी, आम्ही मराठी', अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

यावेळी माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, सरचिटणीस संजय मंगोडेकर, रवी देशपांडे, प्रदीप बोन्द्रे, मंडलाध्यक्ष राजेंद्र बाबर, सोमनाथ भोंडवे, योगेश चिंचवडे, भगवान निकम, प्रसन्न अष्टेकर, विजय शिनकर, कोमल शिंदे, ॲड. दत्ता झुळूक, महेंद्र बाविस्कर, महेश बालकवडे, राकेश नायर, मंडलाध्यक्षा पियुषा पाटील, दीपक भंडारी, जनार्धन तालेरे, निलेश जगताप, सचिन बंडी, दीपाली बेलसरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतातील डॉक्टर परदेशाची वाट का धरतात?




**आरोग्यव्यवस्थेच्या वाढत्या केंद्रीकरणाबाबत 'आरोग्यव्यवस्थेचे बदलते अर्थकारण रुग्णाला मेटाकुटीला आणणारे' या लेखात (३ ऑक्टोबर) आपण जाणून घेतले. या प्रश्नाचा आणखी एक पैलू असा की, आरोग्यव्यवस्था किंवा रुग्णालयांना इतका पैसा मिळतो आहे, तर त्याचा लाभ तेथील कर्मचाऱ्यांना होतो आहे का?**

या व्यवस्थेत कार्यरत असलेले कर्मचारी श्रीमंत होत आहेत का? या दोन्हीचे उत्तर 'नाही' असे आहे. भारतीय वैद्यकीय शिक्षण यंत्रणेच्या रचनेतच त्यातील केंद्रीकरणाची काही कारणे लपलेली आहेत. वैद्यकीय शिक्षणाचा वाढता खर्च हे बाजारीकरणाचे मोठे कारण आहे. देशात आज अवघी १०८ सरकारी वैद्यकीय महाविद्यालये असून त्यात १,०८,८४८ पदवीधर आणि ६८,००० पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा आहेत, तर बाकी ५९८ खासगी महाविद्यालये आहेत. प्रत्येक शासकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर शासन शुल्क सवलतीच्या माध्यमातून सुमारे ३५ लाख रुपये खर्च करते. परंतु खासगी वैद्यकीय पदवीधर शिक्षण घ्यायचे असल्यास आज एका विद्यार्थ्याला १.५ ते २ कोटी रुपये खर्च करावे लागतात. पदव्युत्तर शिक्षण घेईपर्यंत हा आकडा आणखी वाढतो. शिक्षणानंतर रुग्णालय सुरू करायचे असल्यास खर्च काही कोटी रुपयांच्या घरात



जातो. परिणामत: अनेक विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेऊन नोकरी करणे पसंत करतात. इतके कर्ज डोक्यावर असताना आणि लठ्ठ पगाराची नोकरी खुणावत असताना कुठलाही विद्यार्थी ग्रामीण भागातील सेवांकडे कसे वळणार? ग्रामीण भागात काम करताना येणारे अनुभव, अपुऱ्या मूलभूत सेवा, तुटपुंजे आर्थिक सहाय्य आणि कागदोपत्री 'माहिती' आणि 'अहवाल' वेळेवर भरण्यावर असलेले लक्ष हे निश्चितच कुठल्याही विद्यार्थ्याला हुरूप देणारे नाही. त्यामुळे ग्रामीण भागात सेवा पुरवण्यास बहुतांश वैद्यकीय विद्यार्थी आणि तज्ज्ञ तयार नसतात.आज भारताबाहेर नोकऱ्या शोधण्याची अनेक वैद्यकीय कर्मचाऱ्यांची इच्छा दिसते. भारतातील ६.४ लाख परिचारिका आज देशाबाहेर कार्यरत आहेत. भारत आणि फिलिपीन्स हे देश ही मागणी पुरवण्यात अग्रेसर आहेत, तर दुसरीकडे देशात पाच लाख अतिरिक्त परिचारिकांची गरज आहे. भारतातल्या आरोग्य व्यवस्थेतले पगार आणि कार्यालयीन परिस्थिती तितकीशी चांगली नाही. भारतातून वैद्यकीय तज्ज्ञ आणि परिचारिका का निघून जात आहेत याचा आपण अगदी अलीकडेपर्यंत विचार केलेलाच नाही, आणि अजूनही त्यावर ठोस पावलेही उचलली गेलेली नाहीत. महानगरांमध्ये उच्चभ्रू मानल्या गेलेल्या रुग्णालयात आजही बहुतांश परिचारिकांचा पगार महिन्याला २५ ते ५० हजार इतकाच आहे. कोविड काळात देशभरात परिचारिकांनी समान आणि पुरेशा वेतनाची मागणी केली होती. परंतु त्यावर दिल्ली राज्य शासनाने नियम केल्यावर मात्र गहजब उडाला. अनेक मोठ्या रुग्णालयांनी यामुळे किंमत वाढून रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होईल आणि रुग्णालयांचे अर्थकारण विस्कळीत होईल असे नमूद केले होते. प्रश्न हा आहे, की रुग्णालयांकडे परिचारिकांना वेतनवाढ द्यायला आज खरंच पैसे नाहीत का?मोठमोठ्या रुग्णालय कंपन्यांच्या नफ्याकडे पाहता त्यांना पैशांची चणचण असल्याचे दिसत नाही. अपोलो, मॅक्स, मणिपाल रुग्णालय या मोठ्या साखळी कंपन्यांचा मागील वर्षाचा नफा हा साधारणत: १०००-११०० कोटी रुपये होता. यावर्षीच्या सुरुवातीलाच मणिपाल रुग्णालय साखळीने १४०० कोटी रुपये रोख देऊन पूर्व भारतातील एक रुग्णालय साखळी विकत घेतली. तसेच डिसेंबर २०२३ मध्ये याच रुग्णालय साखळीच्या मालकांनी १३०० कोटी रुपये देऊन एका ई-फार्मसी कंपनीत मोठी भागीदारी विकत घेतली. या रुग्णालयांना परिचारिका किंवा इतर कर्मचाऱ्यांना योग्य मोबदला देणे शक्य नाही हे फारच दुरापास्त वाटते. अशा रुग्णालयांना कंटाळून परिचारिका देशाबाहेर संधी शोधतात. हे स्थलांतर सुकर करण्यास काही नावाजलेल्या कंपन्या पाश्चिमात्य देशातील रुग्णालयांना मदत करत आहेत. अगदी तशीच नसली तरी काहीशी गंभीर परिस्थिती आज वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीतही दिसून येते. युक्रेनचे युद्ध सुरू झाले तेव्हा अनेकांना आपले जवळजवळ १८ हजार वैद्यकीय विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहेत.

## प्रासंगिक »

# जातीचा तुरुंग

***'एखादे काम हलके आहे असे समजणे हेच जात व्यवस्थेचे निदर्शक', हे राज्यांच्या तुरुंगनियमावलीबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील विधान तर बोधवाक्य ठरावे...***

देशात जात हा एक सर्वात मोठा तुरुंग आहे हे अमान्य करणे 'सारे कसे छान छान' हे गीत बसता-उठता आळवणाऱ्यांनाही अवघड. 'आम्ही कसे जात-पात पाळत नाही' असे मिरवणारेही त्यांच्या 'अ-जात'शत्रुत्वाची उदाहरणे देऊ लागले की त्यामागील जातीचे वास्तव उघडे पडते. हे सारे अमान्यच करावयाचे असेल त्यांची गोष्ट वेगळी. पण इतरांस या जातवास्तवाची दखल घ्यावी लागते. ते घेतात. त्यामुळे या वर्गांस आपल्या प्रत्येक निर्णयामागील जातीचा कोन स्पष्टपणे जाणवतो आणि तो ते मान्य करतात. आपल्या सांस्कृतिक प्रतिक्रियाही उमटतात त्या पूर्वायुष्यात मिळालेल्या संस्कारांतून जे जात या संकल्पनेवरच आधारित असतात. हे जात-वास्तव इतक्या प्रकर्षाने नमूद करण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ऐतिहासिक निर्णय.

लडाख या केंद्रशासित प्रदेशाचा राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात समावेश करून स्वायत्तता द्यावी, या मागणीसाठी लेहहून दिल्लीकडे कूच करणारे सुधारणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक व त्यांच्यासह असलेल्या १५० ते १७५ समर्थकांना दिल्लीच्या वेशीवरच अडवून या साऱ्यांची रवानगी पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# आंदोलक 'आत'; बलात्कारी बाहेर!

शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या वांगचुक व त्यांच्या समर्थकांना हरियाणा-दिल्ली सीमेवर रोखण्यात आले त्याच दिवशी हरियाणात निराळेच घडत होते. दोन हत्या आणि दोन बलात्कारप्रकरणी २० वर्षांची शिक्षा भोगत असलेल्या 'डेरा सच्चा सौदा' पंथाचा प्रमुख गुरुमीत राम रहीम सिंग याला हरियाणा सरकारने घाईघाईत पॅरोल मंजूर केला. शिक्षा भोगत असलेल्या एखाद्या साध्या कैद्याने पॅरोलसाठी अर्ज केल्यावर त्याच्या अर्जावर सहा-सहा महिने विचारच केला जात नाही. नंतरची प्रक्रिया वेगळीच. अर्थात, कैदी आर्थिकदृष्ट्या 'वजनदार' असल्यास लगेचच सुट्टी मिळते हे वेगळे. राम रहीमने शनिवारी अर्ज दाखल केला. हरियाणात सध्या निवडणूक आचारसंहिता लागू असल्यानेच रविवारी हरियाणाच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने राम रहीमच्या पॅरोलच्या अर्जाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले; तर सोमवारी त्याच निवडणूक



अधिकाऱ्याने राज्य सरकारला पॅरोलबाबत पूर्ण अधिकार असल्याचा निर्वाळा दिला. मंगळवारच्या दिवसात सूत्रे हलली आणि गांधी जयंतीच्या सुट्टीच्या दिवशी राम रहीम २० दिवसांच्या पॅरोलवर कडक पोलीस बंदोबस्तात तुरुंगाबाहेर आला. राजकीय सोय, हे राम रहीमच्या सुट्टीसाठी झालेल्या लगबगीचे खरे कारण. राजकारणापायी बाबा-बुवांच्या उचापतींकडे दुर्लक्ष कसे होते याची आणखीही उदाहरणे आहेत. उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये गेल्या जुलै महिन्यात स्वत:स 'भोलेबाबा' म्हणवणाऱ्या सूरजपाल सिंह याच्या कार्यक्रमानंतर त्याच्या वाहनाने मार्ग बदलल्यामुळे चेंगराचेंगरी होऊन १२१ लोकांचा नाहक बळी गेला होता. या प्रकरणात उत्तर प्रदेश पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात 'भोलेबाबा'चे नावच समाविष्ट केलेले नाही. परिसरातील नागरिकांवर भोलेबाबाचा पगडा असल्यानेच उत्तर प्रदेशातील योगी सरकारने सुरुवातीपासूनच या प्रकरणातून या वादग्रस्त बाबाला वाचवण्याचा प्रयत्न केला. आरोपपत्रात भोलेबाबाचे नाव नसल्याबद्दल विरोधी पक्षांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.हरियाणात येत्या शनिवारी विधानसभेसाठी मतदान होत आहे. लोकांची नाडी कशी ओळखायची यात ही बाबामंडळी चतुर. त्यात अलीकडे या मंडळींची राजकीय महत्त्वाकांक्षाही वाढली आहे. त्यांच्या अनुयायांची संख्या पाहून, मतांच्या लालसेने राजकारणी या बाबाबुवांच्या अवैध उचापती पोटात घालतात. हरियाणाच्या सहा जिल्ह्यांमधील २० ते २५ विधानसभा मतदारसंघांमध्ये राम रहीमचा पगडा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अहमदनगर नव्हे अहिल्यानगर!

## विखे पाटीलांनी सोशल मीडियावर पोस्ट करत दिली माहिती

। बारामती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अहमदनगर जिल्ह्याचं नाव अहिल्यानगरकरण्याच्या मागणीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. ही मागणी गेल्या अनेक दिवसांपासून होत होती. राज्य सरकारने पाठवलेल्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. राज्याचे महसूल आणि पशुसंवर्धन दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही माहिती दिली आहे. त्यामुळे आता अहमदनगर जिल्हा अहिल्यानगरनावाने ओळखला जाणार आहे.**




अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानग असे करण्याची मागणी गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात येत होती. औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्यांची नावं बदलल्यानंतर अहमदनगर जिल्ह्याचं नाव बदलण्याच्या मागणीला जोर चढला. गेल्या वर्षी चोंडी येथे झालेल्या अहिल्यादेवींच्या जयंती दिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलण्याची घोषणा केली होती. त्यांनी जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचं नाव देण्याची घोषणा केली होती.नगर जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली.आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर करण्यास मान्यता मिळाल्याने वचनपूर्ती झाल्याचा मनस्वी आनंद आहे. निर्णय होण्याकरीता सहकार्य करणारे विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार. अशी पोस्ट राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे. महिनाभरापूर्वी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत रेल्वे स्थानकाचं नाव बदलण्यात येणार असल्याचं जाहीर केलं होतं. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्याचं नाव बदललं जाणार हे स्पष्ट झालं होतं. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी हा निर्णय आता झाला आहे.अहमदनगर शहराचे नाव 'अहिल्यानगर' करण्याचा राज्य मंत्रिमंडळाने १३ मार्च २०२४ ला घेतला. तर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचेही नाव बदलण्यात आलं, या तालुक्याला राजगड असे नाव देण्यात आलं.

या निर्णयाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला होता. आता विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्र सरकारने अहमदनगरचं नाव अहिल्यानगर करण्याला मंजुरी दिली आहे. कुठल्याही जिल्ह्याचं किंवा शहराचं किंवा ठिकाणाचं नाव बदलण्यासाठी भारतीय राज्यघटनेत काही खास उल्लेख नाही. नामांतर करण्याबाबत केंद्र सरकारने राज्यांना काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाचे वकील दिलीप तौर यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिली होती. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार राज्याला त्यांच्या जिल्ह्याचं नाव बदलायचं असेल तर त्यांना विधानसभेत तसा निर्णय घ्यावा लागेल.त्यानंतर केंद्र सरकारच्या पाच विभागांकडून त्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळवावं लागेल. यानंतर नामांतरावर अंतिम निर्णय केंद्र सरकार घेईल.अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर असे करण्याची मागणी गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात येत होती. औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्यांची नावं बदलल्यानंतर अहमदनगर जिल्ह्याचं नाव बदलण्याच्या मागणीला जोर चढला.

गेल्या वर्षी चोंडी येथे झालेल्या अहिल्यादेवींच्या जयंती दिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलण्याची घोषणा केली होती. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही माहिती दिली आहे. त्यामुळे आता अहमदनगर जिल्हा अहिल्यानगरनावाने ओळखला जाणार आहे.

### वेल्हे तालुक्याचेही नाव बदलण्यात आलं

आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर करण्यास मान्यता मिळाल्याने वचनपूर्ती झाल्याचा मनस्वी आनंद आहे. निर्णय होण्याकरीता सहकार्य करणारे विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार. अशी पोस्ट राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.महिनाभरापूर्वी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत रेल्वे स्थानकाचं नाव बदलण्यात येणार असल्याचं जाहीर केलं होतं.

# हर्षवर्धन पाटलांचा भाजपाला 'राम राम'

## शरद पवार गटात जाणार असल्याचं केलं स्पष्ट

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**२०१९ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी भाजपामध्ये होणाऱ्या मेगाभरतीची जोरदार चर्चा होती. हर्षवर्धन पाटील यांनी ११ सप्टेंबर रोजी भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे काँग्रेसला इंदापुरात मोठा धक्का बसला. त्यानंतर बरोबर दोन वर्षांनी १३ ऑक्टोबर २०२१ला हर्षवर्धन पाटील म्हणाले, "भाजपात आल्यापासून आता शांत झोप लागते"...**



आता बरोबर तीन वर्षांनी आणि पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकांच्याच आधी हर्षवर्धन पाटील यांनी भाजपाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची वाट धरली आहे. 'आता झोप लागते का?' असा प्रश्न पत्रकार परिषदेत विचारल्यावर त्यांचं उत्तर होतं 'नो कमेंट्स'!जवळपास दीड महिन्यापासून प्रत्यक्ष चर्चा आणि त्याआधी अप्रत्यक्ष घडलेल्या घडामोडी या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन पाटील लवकरच भाजपातून बाहेर पडतील असं सांगितलं जात होतं. खुद्द भाजपाच्या नेत्यांकडून पाटील यांनी तसं काही सांगितलं नसल्याचं धोरण अगदी काल-परवापर्यंत कायम ठेवलं नसलं, तरी याबाबत आपण देवेंद्र फडणवीसांशी चर्चा करून त्यानंतर निर्णय घेतल्याचं हर्षवर्धन पाटील यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केलं. त्यामुळे त्यांच्यात आणि पक्षाच्या राज्यातील नेत्यांमध्ये याबाबत चर्चा झाल्याचं आता स्पष्ट झालं आहे.

### हर्षवर्धन पाटलांचे 'नो कमेंट्स'

पाच वर्षांपूर्वी निवडणुकांच्या आधी पाटील यांनी मतदारसंघाची कामं व नागरिकांसाठीच्या योजनांचा हवाला देऊन भाजपामध्ये प्रवेश केला होता. पण गेल्या काही महिन्यांपासून हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी मिळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी आपले पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भाजपाला सोडचिठ्ठी दिली आहे. मात्र, यावेळी पत्रकार परिषदेत त्यांच्याच 'झोप चांगली लागते' विधानाबाबत विचारणा केली असता त्यावर त्यांनी फक्त 'नो कमेंट्स' म्हणत कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

# तर इस्रायल फार काळ टिकणार नाही!

## खोमेनींचं पाच वर्षांत पहिल्यांदाच सार्वजनिक भाषण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



इराणची राजधानी तेहरानमध्ये ४ ऑक्टोबर रोजी दुपारी नमाज पठणानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खोमेनी यांनी भाषण केलं. त्यांनी इस्रायल व पॅलेस्टाइनमध्ये चालू असलेल्या संघर्षावर टीप्पणी केली. इराणच्या या सर्वोच्च नेत्याने पाच वर्षांनंतर नमाज पठणानंतर भाषण केलं. पॅलेस्टाइनचा संघर्ष योग्य असल्याचं खोमेनी यांनी म्हटलं आहे. ते म्हणाले, “पॅलेस्टाइनला त्यांची स्वतःची जमीन परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे”. यावेळी खोमेनी यांनी सर्व मुस्लीम राष्ट्रांना एकजूट होण्याचं आवाहन केलं. इराणपासून लेबनॉनपर्यंतच्या संपूर्ण मुस्लीम समुदायाला आवाहन केलं की त्यांनी पॅलेस्टाइनसाठी उभं राहावं.

अयातुल्लाह खोमेनी म्हणाले, “अफगाणिस्तानपासून येमेनपर्यंत आणि इराणपासून गाझा, लेबनॉनपर्यंत सर्व मुस्लीम देशांनी कंबर कसावी लागणार आहे. इराण हेझबोलाबरोबर उभा आहे. इस्रायलला इराणने सडेतोड प्रत्युत्तर दिलं आहे. इस्रायलने आमच्यावर हल्ला केला तर इराणदेखील स्वस्थ बसणार नाही. पॅलेस्टाइन, लेबनॉन व इराणमधील इस्रायलच्या कारवायांमुळे आम्ही दुःखी आहोत, मात्र आम्ही पराभूत झालेलो नाही”.खोमेनी म्हणाले, “अरब मुस्लिमांनी देखील यामध्ये उतरावं. सर्व मुस्लिमांनी बंधुभाव बाळगावा. यातच आपल्या समुदायाचं भलं आहे. इस्रायलच्या हल्ल्यांचा, आक्रमणांचा आम्ही विरोध करत आहोत, यापुढेही करत राहू. आमच्या सशस्त्र बलांनी इस्रायलविरोधात केलेली कारवाई कौतुकास्पद आहे. ती कारवाई उचित व कायदेशीर आहे. गरज पडल्यास आम्ही इस्रायलवर पुन्हा एकदा हल्ला करू. इस्रायल आमच्यासमोर फार वेळ टिकणार नाही” “दक्षिण कोरिया आणि त्यांचा मित्र अमेरिकेने मिळून प्योंगयांग प्रदेशावर हल्ला केला तर आमचं सैन्य कुठलाही संकोच न करता अण्वस्त्रांचा वापर करेल”, किम जोंग-उन म्हणाला. एकीकडे इस्रयाल-हमास, इस्रायल-लेबनॉनपाठोपाठ इस्रायल-इराण युद्ध पेटलं आहे. रशिया-युक्रेन संघर्ष देखील थांबलेला नाही. अशातच आता उत्तर कोरियाने दक्षिण कोरियाला अण्वस्त्र हल्ल्याची धमकी दिल्यामुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. उत्तर कोरियामधील सरकारी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार किम जोंग-उन म्हणाला, “आमच्या शत्रूने डीपीआरकेच्या (डेमोक्रॅटिक पीपल्स रिपब्लिक ऑफ कोरिया) सार्वभौमत्वावर अतिक्रमण करण्यासाठी सशस्त्र दलांचा वापर करण्याचा प्रयत्न केला तर डीपीआरके कुठलाही संकोच न बाळगता आण्विक हल्ला करेल. आण्विक शस्त्रांसह आमच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व विध्वंसकारी अस्त्रांचा वापर करू”.उत्तर कोरियाची अधिकृत वृत्तसंस्था, कोरियन सेंट्रल न्यूज एजन्सीने (KCNA) दिलेल्या वृत्तानुसार किम जोंगने बुधवारी लष्कराच्या स्पेशल ऑपरेशन्स फोर्स युनिटला भेट दिली. यावेळी तो म्हणाला, दक्षिण कोरियाने आपल्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर आपलं सैन्य पूर्ण ताकदीनिशी त्यांच्यावर तुटून पडेल. त्या युद्धात आम्ही अण्वस्त्रांसह सर्व विध्वंसक शस्त्रास्त्रांचा वापर करू.यावेळी किम जोंग उनने दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक-येओल यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. दक्षिण कोरियाच्या अमेरिकेशी दृढ होत असलेल्या संबंधांवरून उत्तर कोरियाच्या हुकूमशाहचा थयथयाट होत असल्याचं पाहायला मिळत आहे. किम जोंग-उन म्हणाला, “सोल (दक्षिण कोरियाची राजधानी) व वॉशिंग्टन (अमेरिकेची राजधानी) मिळून पूर्व आशियातील सुरक्षा व शांतता नष्ट करत आहेत”. गेल्या अनेक दशकांपासून उत्तर कोरिया व दक्षिण कोरियामध्ये संघर्ष चालू आहे. अलीकडेच दक्षिण कोरियाची राजधानी सोलमध्ये लष्कराच्या परेडचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी शत्रूचे तळ उद्ध्वस्त करू शकणाऱ्या क्षेपणास्त्रांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं.

### किम जोंग-उन काय म्हणाला

उत्तर कोरियाची अधिकृत वृत्तसंस्था, कोरियन सेंट्रल न्यूज एजन्सीने (KCNA) दिलेल्या वृत्तानुसार किम जोंगने बुधवारी लष्कराच्या स्पेशल ऑपरेशन्स फोर्स युनिटला भेट दिली. यावेळी तो म्हणाला, दक्षिण कोरियाने आपल्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर आपलं सैन्य पूर्ण ताकदीनिशी त्यांच्यावर तुटून पडेल. त्या युद्धात आम्ही अण्वस्त्रांसह सर्व विध्वंसक शस्त्रास्त्रांचा वापर करू. किम जोंग उनने दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक-येओल यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. गेल्या अनेक दशकांपासून उत्तर कोरिया व दक्षिण कोरियामध्ये संघर्ष चालू आहे. दक्षिण कोरियाच्या अमेरिकेशी दृढ होत असलेल्या संबंधांवरून उत्तर कोरियाच्या हुकूमशाहचा थयथयाट होत असल्याचं पाहायला मिळत आहे.

# लाडू प्रकरण : न्यायालयाकडून नव्याने तपासाचे निर्देश

## सदस्यीय समिती स्थापन करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

जगन मोहन रेड्डी मुख्यमंत्री असताना तिरुमला तिरुपती प्रसाद लाडूमध्ये भेसळ करुन प्राण्यांची चरबी वापरण्यात आली. असा खळबळजनक आरोप आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला होता. त्यांच्या या आरोपानंतर यावरून वादही निर्माण झाला होता. तसेच याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती. दरम्यान, या याचिकेवर आता सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नव्याने तपास करण्याचे तसेच या तपासासाठी पाच सदस्यीय समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये दोन सदस्य सीबीआयचे, दोन सदस्य आंध्र प्रदेश पोलिसांचे तर एक सदस्य एफएसएसआयचा असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. तसेच या तपासावर सीबीआयचे संचालक लक्ष ठेवतील, असंही न्यायालयाने सांगितलं आहे. या प्रकरणी राजकीय वाद निर्माण होऊ नये अशी आमची इच्छा आहे, अशी टीप्पणीही न्यायमूर्ती बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती के.वी. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने



केली आहे.या सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडली. यावेळी बोलताना, हे प्रकरण केंद्रीय पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवावी, अशी आमची मागणी आहे. या आरोपात काही तथ्य असेल तर त्यावर दुर्लक्ष करण चुकीचं आहे. कारण तिरुपती बालाजी यांचे भाविक देशभरात आहेत. एसआयटी सदस्यांकडून तपास करण्यात येत असल्याबद्दल कोणताही आक्षेप नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. तर याचिकाकर्त्याच्यावतीने कपिल सिब्बल यांनी न्यायालयाला बाजू मांडली. यावेळी बोलताना, न्यायालयाने या प्रकरणाच्या तपासाची जबाबदारी विशेष पथकाऐवजी स्वतंत्र तपास यंत्रणेकडे सोपवावी, अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, यापूर्वी याप्रकरणाच्या तपासाठी राज्य सरकारकडून एसआयटी स्थापना करण्यात आली होती. एसआयटीने याप्रकरणाचा तपासही सुरू केला होता. मात्र, याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याने हा तपास तात्पुरता स्थगित करण्यात आला होता.

### सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटलं?

आंध्र प्रदेशचे डीजीपी द्वारका तिरुमला राव यांनी यासंदर्भात माहिती दिली होती. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर पाच सदस्यीय समितीकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नव्याने तपास करण्याचे तसेच या तपासासाठी पाच सदस्यीय समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये दोन सदस्य सीबीआयचे, दोन सदस्य आंध्र प्रदेश पोलिसांचे तर एक सदस्य एफएसएसआयचा असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

# भारतीय घरांमध्ये नवरात्रीच्या उत्सवाला विशेषत: महत्त्वाचे स्थान!

देवी दुर्गा आणि राक्षस महिषासुर यांच्यातील युद्ध ही या उत्सवामागील महत्त्वाची कथा आहे. तो एक शक्तिशाली राक्षस होता, ज्याला ब्रह्मदेवाकडून वरदान मिळाले होते, ज्यामुळे तो कोणत्याही मनुष्य किंवा देवाविरुद्ध अजिंक्य होता. तथापि, ब्रह्मदेवाकडून वरदान मिळाल्यानंतर, तो गर्विष्ठ झाला आणि त्याने स्वर्ग आणि पृथ्वीचा नाश केला. देव राक्षसांना पराभूत करू शकले नाहीत, म्हणून त्यांनी मदतीसाठी देवी दुर्गाकडे संपर्क साधला कारण ती सर्व देवतांच्या शक्ती एकत्र करून निर्माण झाली होती आणि स्त्री शक्ती आणि शक्तीचे अंतिम मूर्त रूप म्हणून उदयास आली होती.
त्यानंतर, तिने सिंहावर आरूढ होऊन महिषासुराशी नऊ दिवस आणि रात्र चाललेले भयंकर युद्ध केले आणि शेवटी तिने राक्षसाचा पराभव केला. म्हणून दरवर्षी लोक नवरात्री पाळतात, वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे.देशाच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेचा अविभाज्य भाग असलेल्या हिंदू धर्माच्या संदर्भात नवरात्रोत्सव हा पवित्र आहे. हा उत्सव 'शक्ती' नावाच्या देवी शक्तीला समर्पित आहे. उत्सवाच्या नऊ रात्री दुर्गा देवीची पूजा केली जाते. प्रत्येक दिवस दुर्गेच्या जीवनातील विविध भाग, शक्ती, ज्ञान, संपत्ती इत्यादी नऊ रूपांचे प्रतीक आहे.नऊ दिवसांचा सण मोठा अर्थपूर्ण आहे आणि देशभरात साजरा केल्याचा मोठा इतिहास आहे. सणाच्या हंगामाची सुरुवात विविध समुदायातील लोक देवी दुर्गा पूजेने करतात आणि अंधारावर प्रकाशाचा विजय दर्शवतात. पूजेव्यतिरिक्त, हजारो भाविक, विशेषत: गुजरातमध्ये, गरबा नृत्याने उत्सव साजरा करतात. समांतर, भव्य दुर्गा पूजा देशभरात आयोजित केल्या जातात, ज्यामुळे हा भक्तीपूर्ण उपवास आणि प्रार्थनांचा उत्सव बनतो.बहुप्रतीक्षित नवरात्रोत्सव देखील प्रतिबिंब आणि नूतनीकरणाची संधी देते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्री लोकांना एकत्र आणणारी, शक्ती, भक्ती आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहे.



## नवरात्र म्हणजे काय?

1 नवरात्र हा एक हिंदू सण आहे जो नऊ रात्रींमध्ये साजरा केला जातो, जो देवी दुर्गा आणि तिच्या नऊ अवतारांच्या उपासनेला समर्पित आहे. हे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे आणि उपवास, प्रार्थना, नृत्य आणि सांस्कृतिक उत्सवांद्वारे चिन्हांकित केले जाते.

2 नवरात्री 2024 कधी साजरी केली जाते? नवरात्री 2024 गुरुवार, 3 ऑक्टोबर 2024 रोजी सुरू होईल आणि शनिवारी, 12 ऑक्टोबर 2024 रोजी विजया दशमीला समाप्त होईल.

3 नवरात्री 2024 च्या प्रमुख तारखांमध्ये 3 ऑक्टोबर 2024 रोजी घटस्थापना, 11 ऑक्टोबर 2024 रोजी दुर्गाष्टमी, 11 ऑक्टोबर 2024 रोजी महानवमी आणि 12 ऑक्टोबर 2024 रोजी विजया दशमी यांचा समावेश आहे.

4 नवरात्री म्हणजे चांगल्या आणि वाईट यांच्यातील युद्धाच्या नऊ रात्री, ज्याचा शेवट चांगल्याच्या विजयात होतो. हे देवी दुर्गेचा महिषासुरावरचा विजय आणि रावणावर भगवान रामाचा विजय साजरा करते, जे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे.

5 भारतभर नवरात्री मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. उत्तर भारतात उपवास आणि प्रार्थना यांचा समावेश आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात लोक गरबा आणि दांडिया नृत्य करतात. पूर्व भारतात, दुर्गा पूजा भव्य पंडाल आणि सांस्कृतिक उपक्रमांसह साजरी केली जाते. गोव्यात, विशेष जत्रा आणि मंदिराची सजावट सणाचे प्रतीक आहे, तर केरळमध्ये आयुधा पूजा केली जाते.

# राशिदने चाहत्यांना दिलेलं वचन मोडलं!

## राशिद खानबरोबर एकाच मांडवात तीन भावांचं लग्न

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू राशीद खान लग्नबंधनात अडकला आहे. राशीद खानच्या लग्नाचे फोटो, व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या स्टार क्रिकेटरने अफगाणिस्तानची राजधानी काबूलमध्ये पश्तून रितीरिवाजानुसार लग्न केले, ज्यामध्ये अफगाणिस्तान संघातील अनेक मोठे खेळाडू सहभागी झाले होते. या लग्नाची सोशल मीडियावर आणि क्रिकेट जगतात बरीच चर्चा होत असून अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. विशेष म्हणजे राशिदबरोबर त्याचे इतर तीन भावांनीही लग्न केलं आहे.**



अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू राशिद खानने वयाच्या २६ व्या वर्षी लग्न केले. रशीदने ३ ऑक्टोबरला काबूलच्या एका हॉटेलमध्ये एका शानदार सोहळ्यात लग्नगाठ बांधली. मोहम्मद नबी आणि मुजीब उर रहमान सारखे स्टार क्रिकेटर्स या खास प्रसंगी रशीदच्या आनंदात सहभागी होण्यासाठी पोहोचले. याशिवाय अजमतुल्ला उमरझाई, नजीबुल्ला झादरन आणि रहमत शाह यांनीही राशिदच्या लग्नाला हजेरी लावली होती. अफगाणिस्तानातील अनेक क्रिकेटपटूंनी रशीदबरोबरचे त्यांचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आणि लग्नासाठी शुभेच्छा दिल्या. राशिद खानने कोणाशी लग्न केले याची संपूर्ण माहिती अद्याप समोर आलेली नसली तरी रशीदने त्याच्याच नात्यातील एका मुलीशी लग्न केल्याचा दावा अहवालात केला जात आहे.राशिदच्या लग्नात कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. तालिबानी सैनिक एके-47 घेऊन लग्न समारंभात फिरताना दिसले. यावेळी फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली, ज्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. राशिदचा विवाह काबुलमधील इम्पीरियल कॉन्टिनेंटल हॉटेलमध्ये पार पडला, ज्यात सहकारी क्रिकेटपटू, अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड (ACB) चे अधिकारी आणि तालिबान सरकारमधील अनेक लोक उपस्थित होते. राशिद खान गेल्या महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळताना दिसला होता. ३ सामन्यांच्या या वनडे मालिकेत अफगाणिस्तानने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २-१ असा विजय मिळवून इतिहास घडवला होता. अफगाणिस्तानला प्रथमच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मालिका जिंकण्यात यश आले. खरं तर, २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकापूर्वी राशिद खानने चाहत्यांना वचन दिले होते की तो अफगाणिस्तानला विश्वचषक जिंकून देईपर्यंत लग्न करणार नाही. पण आता त्याने लग्न करून त्याच्या चाहत्यांची मनं मोडली आहेत. त्यामुळे चाहते नाराज आहेत. पण त्यांनी राशिदला त्याच्या नव्या इनिंगसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.एकदिवसीय विश्वचषक २०२३ आणि टी२० विश्वचषक २०२४ मध्ये अफगाणिस्तानने आपल्या अप्रतिम कामगिरीने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. या संघाने गेल्या दोन आयसीसी स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत साधारण संघ नसल्याचे दाखवून दिले आहे. अफगाणिस्तानने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत इंग्लंड आणि पाकिस्तान सारख्या मोठ्या संघांना पराभूत केले होते, तर ते प्रथमच टी-२० विश्वचषक २०२४ च्या उपांत्य फेरीत पोहोचले होते. मात्र उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेकडून संघाला पराभवाचा सामना करावा लागला. अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू राशिद खानने वयाच्या २६ व्या वर्षी लग्न केले. रशीदने ३ ऑक्टोबरला काबूलच्या एका हॉटेलमध्ये एका शानदार सोहळ्यात लग्नगाठ बांधली. मोहम्मद नबी आणि मुजीब उर रहमान सारखे स्टार क्रिकेटर्स या खास प्रसंगी रशीदच्या आनंदात सहभागी होण्यासाठी पोहोचले. याशिवाय अजमतुल्ला उमरझाई, नजीबुल्ला झादरन आणि रहमत शाह यांनीही राशिदच्या लग्नाला हजेरी लावली होती. अफगाणिस्तानातील अनेक क्रिकेटपटूंनी रशीदबरोबरचे त्यांचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आणि लग्नासाठी शुभेच्छा दिल्या. राशिद खानने कोणाशी लग्न केले याची संपूर्ण माहिती अद्याप समोर आलेली नसली तरी रशीदने त्याच्याच नात्यातील एका मुलीशी लग्न केल्याचा दावा अहवालात केला जात आहे. राशिदच्या लग्नात कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. तालिबानी सैनिक एके-47 घेऊन लग्न समारंभात फिरताना दिसले. यावेळी फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली.

### राशीद खान लग्नबंधनात अडकला

ज्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. राशिदचा विवाह काबुलमधील इम्पीरियल कॉन्टिनेंटल हॉटेलमध्ये पार पडला, ज्यात सहकारी क्रिकेटपटू, अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड (ACB) चे अधिकारी आणि तालिबान सरकारमधील अनेक लोक उपस्थित होते.राशिद खान गेल्या महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळताना दिसला होता. ३ सामन्यांच्या या वनडे मालिकेत अफगाणिस्तानने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २-१ असा विजय मिळवून इतिहास घडवला होता. अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू राशीद खान लग्नबंधनात अडकला आहे.

# रुमाल पडल्याने फलंदाजाला मिळाले जीवदान

## टी-20 विश्वचषक 2024 चा पहिलाच सामना अतिशय रोमांचक

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला ३ ऑक्टोबरपासून सुरू झाला. यावर्षी महिला टी-२० विश्वचषक संयुक्त अरब अमिराती (यूएई) मध्ये खेळवला जात आहे, जो पूर्वी बांगलादेशमध्ये खेळला जाणार होता. अ गटात, पाकिस्तान विरुद्ध श्रीलंका सामना ३ ऑक्टोबर रोजी झाला, ज्यामध्ये पाकिस्तानने ३१ धावांनी मोठा विजय नोंदवला. या सामन्यादरम्यान एक विचित्र वाद पाहायला मिळाला.**




ज्यामध्ये अंपायरने फलंदाजाला अगोदर आऊट घोषित केले. त्यानंतर लगेच डेड बॉल देण्यात आला, ज्यामुळे फलंदाज नॉट आऊट राहिला.श्रीलंकेच्या डावातील ते १३ वे षटक होते. पाकिस्तानकडून नशरा संधू गोलंदाजी करत होती, तर श्रीलंकेची फलंदाज नीलाक्षी डी सिल्वा स्ट्राईकवर होती. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर पाकिस्तानने नीलाक्षीविरुद्ध एलबीडब्ल्यूचे अपील केले आणि मैदानी अंपायरनेही तिला आऊट दिले. यानंतर श्रीलंकेचे फलंदाज अंपायरकडे गेले आणि त्यांच्याशी चर्चा केली. यानंतर रिप्ले पाहण्यात आला आणि नीलाक्षीला नाबाद घोषित करण्यात आले. त्याचबरोबर एलबीडब्ल्यूचे अपील केलेला चेंडू डेड बॉल घोषित करण्यात आला. कारण वास्तविक, नशरा गोलंदाजी करत असताना तिच्या कमरेभोवतीचा रुमाल खाली पडला. त्यामुळे नीलाक्षीचे लक्ष विचलित झाले आणि तिने अंपायरकडे तक्रार केली. त्यानंतर अंपायरने तो डेड बॉल घोषित केला. जेव्हा फलंदाज चेंडूचा सामना करायला जातात, तेव्हा त्यांना खूप लक्ष केंद्रित करावे लागते. त्यामुळेच फलंदाजांसमोर म्हणजे स्ट्रेटला ब्लॅक स्क्रीन लावली जाते.

### डेड बॉलबाबत आयसीसीचा नियम

जेणेकरून त्यांचे लक्ष कोणत्याही प्रकारे विचलित होऊ नये. अशा परिस्थितीत गोलंदाजाची टोपी किंवा रुमाल पडल्यास फलंदाजाचे लक्ष विचलित होते आणि त्यामुळे त्याला डेड बॉल घोषित केले जाते. अशा प्रकारची कोणतीही घटना ज्यामध्ये फलंदाज म्हणू शकतो की तो विचलित झाला आहे. ज्यामुळे तो फलंदाजीसाठी पूर्णपणे तयार नव्हता आणि चेंडू डेड बॉल घोषित केला जातो.